सामाजिक उपक्रम : 'दि ग्रीन इंडिया इनिशिएटीव्ह'चा पुढाकार

# ग्रामीण विद्यार्थ्यांना लोडशेडिंगपासून दिलासा

**रोहित नाईक ● विलेपार्ले**

**वीज** गेल्यानंतर किती त्रास होतो याची जाणीव भलेही मुंबईतील तरुणाईला नसेल, मात्र गावातील मुलांना, तरुणांना याची पूर्ण जाणीव असते. कारण त्यांच्याकडे वीज जाणे हे रोजचेच असते. नेमकी रात्रीच्या वेळी वीज गेल्यानंतर त्याचा परिणाम गावातील विद्यार्थ्यांवर होतो. त्यांना शिक्षणासाठी अडचण येते. नेमकी हीच समस्या जाणून विलेपार्ले येथील 'दि ग्रीन इंडिया इनिशिएटीव्ह' (टी.जी.आय.आय.) या तरुणांच्या संघटनेने मुरबाड येथील तीन गावांमधील विद्यार्थ्यांना १५ ऑगस्टच्या दुसऱ्याच दिवशी सौरऊर्जेवरील दिव्यांची मदत करीत त्यांना लोडशेडिंगच्या अडचणींपासून स्वातंत्र्य दिले.



टीजीआयआय संस्थेने रोट्रॅक्ट क्लब ऑफ जय हिंद कॉलेजच्या मदतीने स्वातंत्र्य दिनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी मुरबाड तालुक्यातील कोरावळे, जामघर आणि खडेरे या गावांतील गरजू व आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्या विद्यार्थ्यांना सौरऊर्जेवर चालणाऱ्या एकूण १२ दिव्यांची मदत केली. एका दिव्याच्या प्रकाशात एकावेळी ४ ते ५ विद्यार्थी सहजपणे अभ्यास करू शकतात यानुसार १२ विविध विद्यार्थ्यांच्या गटांना ही मदत करण्यात आली. ही मदत सध्या प्रायोगिक तत्त्वावर असून, या विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे आमच्या मदतीचा वापर केला तर पुढच्या महिन्यात आम्ही या तिन्ही गावांमध्ये मोठ्या स्तरावर आणखी सौरदिव्यांची मदत करू, असे टीजीआयआय संस्थेतर्फे या वेळी स्पष्ट करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नसते. मात्र त्यांना शहरी विद्यार्थ्यांपेक्षा अधिक खडतर परिस्थितीतून शिक्षण घ्यावे लागते. लोडशेडिंग हा त्यातला मुख्य अडसर अहे. रात्रीच्या वेळी वीज गेल्यानंतर आजही या विद्यार्थ्यांना मेणबत्ती किंवा रॉकेल कंदिलाच्या साहाय्याने अभ्यास करावा लागतो. देशाची प्रगती करण्यासाठी या विद्यार्थ्यांची साथ असणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठीच त्यांच्या शिक्षणातील मुख्य अडसर दूर करण्याचा हा आमचा एक छोटा प्रयत्न आहे, असे टीजीआयआयचा युवा अध्यक्ष सचिन शिगवण याने सांगितले. या वेळी रोट्रॅक्ट क्लब ऑफ जय हिंद कॉलेजचे युवा अध्यक्ष नीरज काब्रा, अपर्णा, टीजीआयआयचे युवा स्वयंसेवक नागेश केशुदास, सुमीत बोराडे, अमोल बोराडे आदींची उपस्थिती होती. (प्रतिनिधी)